**प्रेसनोट** **दिनांकः- १४/०८/२०१९.**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## दुखापतीच्या गुन्हयातील पाहीजे असलेला आरोपी पोलीसांच्या ताब्यांत.

दिनांक-१२/०७/२०१९ रोजी १५/०० वाजताचे सुमारांस फिर्यादी सौ. सिंधु दत्तात्रय मोरे, वय-४० वर्षे, राहणार-७३, सेनादत्त पेठ, पुणे यांचे पती दत्तात्रय मोरे हे घरामध्ये बसुन दारु पिऊन फिर्यादीस शिविगाळ करीत असतांना फिर्यादी यांनी त्यांना दारु विऊ नका असे सांगितल्याच्या कारणावरुन त्यांचे पती दत्तात्रय मोरे यांनी घराचे दरवाजांस आडवी लावलेली फरशी फिर्यादीचे डोक्यात मारुन गंभीर जखमी केलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर येथे गुन्हा नोंद क्रमांक-२७७/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३२६, ५०४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यांत आलेला होता. तसेच यातील आरोपी दत्तात्रय मोरे हा सुमारे १५ दिवसांपासुन आपले अस्तित्व लपवून परागंदा झालेला होता.

माननीय स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व माननीय श्री.सुधाकर चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास चालु असतांना सदर गुन्हयातील वरनमुद आरोपी दत्तात्रय मोरे हा न-हे, येथील नवले ब्रिज खाली उभा असलेबाबत तपासपथकातील पोलीस नाईक बाबा दांगडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती नुसार विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री.विजय जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे व प्रशांत शिंदे यांनी बातमीची खातरजमा करुन नवले ब्रिज परिसरांत सापळा रचुन यांतील पाहीजे असलेला आरोपी दत्तात्रय वसंत मोरे, वय-४६ वर्षे, राहणार- ७३-अ, सेनादत्त पेठ, पुणे यास दिनांक-१३/०८/२०१९ रोजी सापळा रचुन ताब्यांत घेवुन त्यास सदर गुन्हयाचे तपासकामी २३.०० वा. अटक करुन वरनमुद गुन्हा उघडकींस आणुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

( दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर